लोकमत



शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांसाठी गुरुवारी प्रवेशाची पहिली फेरी घेण्यात आली. त्याअंतर्गत प्रवेशासाठी रसायनशास्त्र अधिविभागात विद्यार्थी-विद्यार्थिनींनी गर्दी केली.

# शिवाजी विद्यापीठात प्रवेशासाठी गर्दी

## पहिल्या फेरीतील प्रक्रिया सुरु; अकरावीसाठी दहा हजार अर्ज जमा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विविध अभ्यासक्रमांसाठी शिवाजी विद्यापीठाची प्रत्यक्ष प्रवेशाची प्रक्रिया गुरुवारपासून सुरु झाली. पहिल्या फेरीत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विद्यापीठातील विविध अधिविभागांमध्ये विद्यार्थ्यांच्या रांगा लागल्या होत्या. शहरातील महाविद्यालयांमधील अकरावीच्या प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समितीकडे गुरुवारी सहापर्यंत १० हजार ४ अर्ज जमा झाले आहेत.

विद्यापीठातील एम. एस्सी. वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, संगणकशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र, आदी अभ्यासक्रमांसाठी प्रवेशाची पहिली फेरी सुरु झाली. गुणवत्ता यादीत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनी सकाळी नऊ वाजल्यापासून विद्यापीठातील संबंधित विभागांमध्ये गर्दी केली. विभागांमध्ये सकाळी ११ वाजता प्रक्रियेला सुरुवात झाली. पात्र विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची तपासणी, प्रवेश शुल्क भरुन घेण्याची व्यवस्था विद्यापीठ प्रशासनाने या अधिविभागांमध्ये केली होती. सायंकाळी उशिरापर्यंत प्रवेशाची प्रक्रिया सुरु राहिली. प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी बहुतांश विद्यार्थी आपल्या पालकांसमवेत आले होते; त्यामुळे विद्यापीठाचा परिसर गर्दीने फुलला होता. दरम्यान, अकरावीसाठी गुरुवारी सायंकाळी सहा वाजेपर्यंत एकूण १० हजार ४ अर्ज जमा झाले आहेत. ऑनलाईन अर्जातील दुसरा भाग भरण्यासह या अर्जाची प्रत संकलन केंद्राबर जमा करण्याची मुदत शनिवार (दि. २९) पर्यंत आहे.

### अकरावीबाबतची गुरुवारची आकडेवारी

| शाखा | अर्ज भरलेले विद्यार्थी | अर्ज जमा केलेले विद्यार्थी |
|---|---|---|
| कला (इंग्रजी) | - | १० |
| कला (मराठी) | २१२ | ३७० |
| वाणिज्य (मराठी) | २३९ | ४८८ |
| वाणिज्य (इंग्रजी) | ८६ | २८५ |
| विज्ञान | ५४७ | १०४६ |

◆ विद्यापीठ प्रवेशाची द्वितीय फेरी मंगळवारी (दि. २) तर तृतीय प्रवेश फेरी शुक्रवारी, (दि. ५) सकाळी ११ वाजता आहे.

लोकमत

शिवाजी विद्यापीठ : कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत ७७ केंद्रे; पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम

# विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रात प्रवेश सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रामधील बी. ए., बी. कॉम., एम. ए. भाषा (इंग्रजी, हिंदी, मराठी), एम. ए. सामाजिकशास्त्रे (इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र), एम. एस्सी. (गणित), पी. जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन या पदवी व पदव्युत्तर विषयांची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे.

या अभ्यासक्रमांसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ७७ अभ्यासकेंद्रांमध्ये विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, बंदीजन, आदी शिक्षणापासून वंचित असणाऱ्यांना प्रवेशित होता येणार आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेश प्रक्रियेची माहिती उपलब्ध आहे. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी स्वत:चा युजर आयडी व पासवर्ड तयार करुन रजिस्ट्रेशन करणे गरजेचे आहे. दरम्यान, दूरशिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यासक्रमांना विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मान्यता मिळाली असल्याने जे विद्यार्थी व्यवसाय, नोकरी व अन्य कारणांमुळे प्रवेशापासून वंचित राहिलेले आहेत, अशा विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावा, असे आवाहन दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे यांनी केले.

## नियमित शुल्कासह २५ जुलैपर्यंत मुदत

विद्यार्थ्यांच्या सोईकरिता विद्यार्थ्यांनी निवडलेले अभ्यासकेंद्र हेच शक्यतो परीक्षा केंद्र म्हणून दिले जाते. प्रथम वर्ष नव्याने ऑनलाईन अर्ज सादर करताना ऑनलाईन शुल्क भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी बँकेची कागदपत्रे सोबत ठेवणे गरजेचे आहे. पूर्ण ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत अभ्यासकेंद्रावर जमा करण्याची मुदत नियमित शुल्कासह दि. २५ जुलैपर्यंत आहे. अधिक माहितीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन या केंद्राचे उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी केले आहे.

# ‘पदव्युत्तर अभ्यास’ प्रवेशाला सुरुवात

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील ३० हून अधिक विभागातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाच्या प्रवेश निश्चितीला गुरुवारपासून सुरुवात झाली. प्रवेश प्रक्रियेची प्रक्रिया ऑनलाइनचा अवलंब केला आहे. प्रवेश निश्चतीसाठी पूरक कागदपत्रे जमा करण्यासाठी विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती.

प्रवेशाच्या पहिल्या फेरीसाठीची निवड यादी बुधवारी प्रसिद्ध करण्यात आली होती. तत्पूर्वी २० जूनपर्यंत विद्यार्थ्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या होत्या. गुरुवारी पहिल्या फेरीतील प्रवेश प्रक्रियेला व निश्चितीला सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी अनेक विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षासाठीचे शुल्क व इतर फी भरुन प्रवेश निश्चित केला. रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, प्राणीशास्त्र, जैवतंत्रज्ञान, वनस्पतीशास्त्र अशा विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेशाला सुरुवात झाली.



# शिवाजी विद्यापीठात आज दिव्यांगांसाठी रोजगार मेळावा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठात प्रथमच दिव्यांग विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शुक्रवारी (दि. २८) रोजगार व कौशल्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मानव्यशास्त्र विद्या इमारतीमध्ये सकाळी १० ते ५ यावेळेत हा रोजगार मेळावा होणार आहे. बारावी उत्तीर्णांपासून ते पदव्युत्तर पदवीधारकांसाठी नोकरीच्या संधी उपलब्ध केल्या जाणार आहेत. मेळाव्यात महाराष्ट्रातील नामवंत कंपन्या सहभागी होणार आहेत. मेळाव्यात वेगवेगळे कौशल्य व उद्योजगता विकास याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. मेळाव्याचा दिव्यांगांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले आहे.